

**Dr. Abhijit Mantri**
**M.S. (ENT)**
**Phone No :** 25440737, 25412257
**Email ID :** **mantri_a@rediffmail.com**

# टॉन्सिलायटीज् (Tonsilitis)

- **टॉन्सिल्स (Tonsils) म्हणजे काय? सर्वांनाच टॉन्सिल्स असतात का?**

टॉन्सिल्स या अंडाकृती आकाराच्या ग्रंथी (Lymph Nodes) ज्या तोंडाच्या पोकळीमध्ये मागील बाजूला दोन्ही कडांना असतात. हे सर्वाच्यांच शरीररचनेचा भाग असतात. या सर्वसाधारणपणे आढळणाऱ्या घशाच्या दोन्ही बाजूस असणाऱ्या पॅलेन्टाईन टॉन्सिल्स (Palatine Tosils) होत. या प्रमाणे जीभेच्या मागील बाजूस, घशाच्या भित्तिकेवर (wall of the throat) व नाकाच्या आतील बाजूस टॉन्सिल्स असतात.



- **टॉन्सिलायटीज् (Tonsilitis) म्हणजे काय?**

टॉन्सिल्सला होणाऱ्या संसर्गास टॉन्सिलायटीज् असे म्हणतात. यामध्ये घशामध्ये दुखणे, गिळायला त्रास होणे, ताप येणे, गळा सुजणे यांसारखी लक्षणे आढळून येतात. अशा प्रकारचा संसर्ग वारंवार होत असेल तर ही लक्षणे गंभीर टॉन्सिलायटीजची मानली जातात.

नाकाच्या आतील बाजूस (Nasopharynx) स्थित असलेल्या टॉन्सिल्सला ॲडेनॉइडस् (Adenoids) असे म्हणतात. वाढलेल्या टॉन्सिल्समुळे झोपताना घोरण्याचा आवाज येणे, झोपताना तोंड उघडे राहणे, वारंवार सर्दी होणे यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागते.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*

- **टॉन्सिलायटीज् चे निदान कसे केले जाते?**

टॉन्सिलायटीज् चे योग्य निदान रुग्णाला जाणवत असलेल्या लक्षणांवरुन व डॉक्टरांच्या परिक्षणानंतर केले जाऊ शकते. या लक्षणांमध्ये टॉन्सिल्स लाल होणे, टॉन्सिल्सचा आकार वाढणे यांसारख्या लक्षणांचा समावेश असतो.कधी कधी टॉन्सिल्सवर पांढऱ्या रंगाचे व्रण किंवा चटटे् दिसू शकतात.तसेच मानेतील Lymph Nodes चा आकार वाढून ती अधिक संवेदनशील बनण्याची शक्यता देखील असते. त्याचप्रमाणे डॉक्टरांनी घटसर्प (Diphtheria),कॅनडीडीयासीस(Candidiasis)किंवा इनफेक्शस मोनोन्यूक्लीऑसीस (Infectious Mononucleasis)यांसारख्या आजारांच्या लक्षणांसाठीदेखील तपासणी करावी.

थ्रोट कल्चर् (Throat Culture) व रक्त तपासणी केल्यानंतर उपचारांची योग्य दिशा ठरवली जाऊ शकते.

- **टॉन्सिलायटीजवर केले जाणारे उपचार**

तीव्र स्वरुपाच्या टॉन्सिलायटीज्च्या लक्षणांसाठी योग्य प्रकारची प्रतिजैविके (Antibiotics) योग्य कालावधीसाठी दिली जातात.या प्रतिजैविकांबरोबरच वेदना व ताप कमी करण्यासाठी देखील काही औषधे दिली जातात.

डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे विश्रांती घेतल्याने, मीठ घातलेल्या कोमट पाण्याने गुळण्या केल्याने, आहारामध्ये जास्तीत जास्त कोमट द्रव पदार्थांचे सेवन केल्याने रुग्णास अधिक बरे वाटू शकते. तसेच क्लोऱ्हेक्सीडाईन (Chlorhexidine) किंवा पोव्हीडन आयोडाइनने (Povidone Iodine) गुळण्या केल्याने, सकींग कॅन्डीज् (Sucking Candies) किंवा लोझेनजेस्(Lozenges) यांसारख्या औषधांचा वापर केल्याने वेदना व घशातील खरखर कमी होऊ शकते.

ॲडीनॉईडसाठी (Adenoid - वाढलेल्या टॉन्सिल्ससाठी) वाफ घेतल्याने व नाकात डीकन्जेस्न्टट ड्रॉप्स् (Decongestant Drops) घातल्याने आराम मिळू शकतो.

जर एखाद्याला वर्षातून ४ ते ५ वेळा टॉन्सिल्सचा त्रास होत असेल तर अशा प्रकारच्या वेदनादायक टॉन्सिल्ससाठी शस्त्रक्रियेचा पर्याय सुचविला जातो.पण अशा प्रकारची शस्त्रक्रिया करुन घेण्याचे प्रमाण खूप कमी आहे. दररोज व्यायाम करणे, दररोज गुळण्या करणे, घशाला त्रासदायक ठरणारे पदार्थ खाणे टाळणे, संतुलित आहार घेणे यांसारखे काही राहणीमानातील बदल केल्याने वारंवार होणारा टॉन्सिल्सचा त्रास टाळता येऊ शकतो.परंतु हे सर्व करुनही जर होणारा त्रास थांबत नसेल तर मात्र शस्त्रक्रिया करुन घेणेच हितावह ठरते.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*

झोपताना श्वासाचा आवाज येणे (घोरणे) झोपताना तोंडातून श्वासोच्छवास घेतला जाणे यांसारख्या समस्यांवर उपचार करण्यासाठी ॲडिनॉयक्टॉमीचा (Adenoidectomy) सल्ला दिला जातो.

- **शस्त्रक्रिया करणे गरजेचे असते का?**

खालील कारणांमुळे शस्त्रक्रिया करणे हिताचे ठरते.

१. प्रत्येक आजाराचा मुलाच्या शारीरीक व मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होत असतो. शारीरीक स्वास्थ्यावर परिणाम होण्याची उदाहरणे द्यायची झाली तर वजन कमी होणे, उंची न वाढणे इत्यादी.
२. आजारपणामुळे लहान मुलांना शाळेत न पाठवल्यामुळे त्यांना एकटेपणा वाटून त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर देखील परिणाम होऊ शकतो.
३. शस्त्रक्रियेमुळे मुलांची नैसर्गिक वाढ होण्यास मदत होते हे जरी खरे असले तरी लक्षणे नसलेल्या मुलांची उंची शस्त्रक्रियेमुळे वाढू शकत नाही.
४. वाढलेल्या टॉन्सिल्समुळे चेहऱ्याच्या ठेवणीत कायम स्वरुपाचे बदल होणे, दातांच्या रचनेत बदल होणे, पोट बिघडणे यांसारखे काही बदल घडून येऊ शकतात.

- **टॉन्सिलायटीजच्या शस्त्रक्रियेला पर्याय आहे का?**

टॉन्सिलायटीजसाठी होमियोपॅथी किंवा आयुर्वेदिक उपचार काही ठराविक कालावधीसाठी (साधारण ३ महिन्यांसाठी) घेतले जाऊ शकतात. या दोघांपैकी जर कुठल्याही उपचारपद्धतीमुळे योग्य ते परिणाम दिसून आल्यास ती उपचारपद्धती पुढे अवलंबणे योग्य ठरते. परंतु असे न झाल्यास मात्र शस्त्रक्रिया करुन घेणेच हितावह ठरते.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*